INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2018

SPECIAL ISSUE - 50

## Literature : New Trends & Tendencies

## साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह

## साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह



अतिथी संपादक :
डॉ. आर. एच. गुप्ता
प्राचार्य,
संत मुक्ताबाई कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगाव

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
येवला. जि. नाशिक.

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC) List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Attested
Principal
Sau. Rajanitai Nanasaheb Deshmukh Arts, Commerce & Science College, Bhadgaon

156

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 45 | ग्रामीण साहित्य- नवीन टप्पा-इडा पीडा टळो | डॉ.विजया पाटील | 248 |
| 46 | नामदेव ढसाळ एक परिवर्तनवादी कवी | डॉ. माणिक माधव बागले | 254 |
| 47 | जागतिकीकरण आणि मंगेश नारायणराव काळे व हेमंत दिवटे यांची कविता | डॉ. अतुल मधुकरराव देशमुख | 257 |
| 48 | आदिवासी साहित्य आणि लोकजीवन | इंद्रायणी ज्ञानेश्वर सैंदाणे | 261 |
| 49 | प्रेमानंद गज्वी : एक सामाजिक, वास्तववादी प्रयोगशील नाटककार | डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे | 267 |
| 50 | आदिवासी लेखिकांच्या कवितेतील स्त्रीजाणीव | विलास जयंत गावीत | 272 |
| 51 | माती पंख आणि आकाश : एका ध्येयवेड्या ग्रामीण युवकाची यशोगाथा | सातव समाधान काशिराम | 277 |
| 52 | वृत्तपत्रीय लेख | डॉ. रंजना मधुकर कदम | 284 |
| 53 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री नाटककारांच्या नाटकातील स्त्रीवाद | रत्ना जवरास | 289 |
| 54 | UNISCO अहवाल २०११ और खानदेशातील आदिवासी बोली | डॉ. प्रदीप औजेकर | 294 |
| 55 | बालकथा साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह | हर्षदा निंबा बोरसे | 300 |
| 56 | " जैत रे जैत " या कादंबरीतील निसर्गवर्णन | वर्षा रविंद्र उपाध्ये<br>नेहा सुनिल पवार | 307 |
| 57 | मराठी आदिवासी साहित्य : एक अभ्यास विशेष संदर्भ 'तृष्णा' आत्मवृत्तपर कादंबरी | अनिता नामदेवराव रानवळकर | 311 |
| 58 | किरवंत नाटकातील संवाद चातुर्य : एक शोध | डॉ. ज्ञानेश्वर रामलाल भोई | 315 |
| 59 | डॉ. अलका कुलकर्णी यांच्या 'चकवा' कादंबरीचा आशय | संजय धर्मा पाटील | 319 |
| 60 | ग्रामीण साहित्य निर्मिती : एक शोध | गणेश दिगंबर सावजी | 323 |
| 61 | आदिवासी साहित्य | डॉ. विठ्ठल केदारी | 329 |
| 62 | ग्रामीण साहित्य प्रवाह : कादंबरी | डॉ. प्रशांत लगडे | 332 |
| 63 | **लोकसाहित्यातील प्रयोगसिध्द लोककलांचा विश्लेषणात्मक अभ्यास** | **डॉ.सहदेव विलासराव रसाळ** | 337 |
| 64 | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कविता | डॉ. हिरालाल सोमा पाटील | 344 |
| 65 | 'अस्मितादर्श' - एक बहुआयामी सर्जनशील | ममता काशिनाथ भारुडे<br>डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे | 348 |


Attested
Principal
Sau. Rajnibai ... Saheb Deshmukh Arts, Commers & Science College, Bhadgaon



157

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

# जागतिकीकरण आणि मंगेश नारायणराव काळे व हेमंत दिवटे यांची कविता

डॉ. अतुल मधुकरराव देशमुख
साहाय्यक प्राध्यापक
सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालय,
भडगाव, जि. जळगाव.
भ्रमणध्वनी : ९७६६३३८३६६
ई मेल - atuldeshmukh156@gmail.com

**प्रस्तावना :**

जागतिकीकरणाने आपल्या समाजाचा चेहरामोहरा पार बदलवून टाकला आहे. त्याचे बरे-वाईट परिणाम आपल्यापर्यंत पोहोचले आहेत, पोहचत आहेत. ज्या काळात आपण वावरत आहोत; त्या काळात झालेल्या बदलांचे, परिणामांचे प्रतिबिंब आजच्या आपल्या साहित्यातून अधोरेखित झाले आहे का ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी या काळातील लिहिले गेलेले / जाणारे साहित्य तपासून पाहिले तर लक्षात येते, की या बदलांचा, परिणामांचा थेट परिणाम आजच्या मराठी कवितेतून अधोरेखित होऊ लागला आहे. नव्वदोत्तरी कवितेने या बदलांची नोंद ठळकपणे घेतली आहे. नव्वदनंतरच्या कवींच्या प्रकाशित झालेल्या संग्रहांची संख्या पाहिली तर उद्या महत्त्वाचे ठरु शकतील अशा अनेक कवींच्या संग्रहांचा यात समावेश आहे. जागतिकीकरणाच्या बऱ्यावाईट परिणामांचा वेध घेणारे हे कवी आहेत. यात अरुण काळे, महेंद्र भवरे, हेमंत दिवटे, सचिन केतकर, सलिल वाघ, संजीव खांडेकर, लक्ष्मण महाडिक, श्रीधर तिळवे, मन्या जोशी, वर्जेश सोळंकी, प्रवीण बांदेकर, दिनकर मनवर, दासू वैद्य, अरुणचंद्र गवळी, मंगेश नारायणराव काळे, हेमंतकुमार कांबळे, ज्ञानदा, मनोज पाठक, केशव सखाराम देशमुख इत्यादी अनेक कवींनी जागतिकीकरणानंतरच्या परिणामांचा, बदलांचा वेध आपल्या कवितेतून ठळकपणे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. विसाच्या शतकातील अखेरच्या दशकातील शेवटची काही वर्षे नि एकविसाच्या शतकातील पहिले दशक या कवितेने व्यापल्याचे दिसते.

समकालीन असणाऱ्या कवींनी जागतिकीकरणाचा वेध कोणत्या प्रकारे घेतला आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळेच वर उल्लेखलेल्या कवींपैकी मंगेश नारायणराव काळे व हेमंत दिवटे या कवींच्या काही कवितांचा थोडक्यात परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

**मंगेश नारायणराव काळे :**

'शक्तिपाताचे सूत्र' आणि 'मंगेश नारायणराव काळेची कविता' हे मंगेश नारायणराव काळे यांचे अलीकडेच प्रकाशित झालेले दोन कवितासंग्रह आहेत. काळाच्या पटलावरील विविध अवस्थांचे दर्शन मंगेश काळे यांच्या या संग्रहांतील कवितांमधून घडते. संगणक युगातील अनेक संकल्पनांचा

Attested By
Principal
Sau. Rajani... Deshmukh Arts, Commerce & Science College, Bhadgaon



158